१४.**संगणकीकरण शुल्क:-** प्रवेशीत विद्यार्थ्यांची संपुर्ण अद्ययावत माहिती महाविद्यालयाकडे असावी, वेळोवेळी ही माहिती अद्ययावत करावी. यासाठी संगणक प्रणाली व अनुषंगीक सामुग्री खरेदी, देखभाल या करीता या शुल्काचा वापर करावा. ई-सुविधा च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या Infrastructure साठीही या शुल्काचा वापर करावा.**(मात्र एम.के.सी.एल. शी झालेल्या करारानुसार एम.के.सी.एल. शुल्कामधुन विद्यापीठास व महाविद्यालयास काहीही शुल्क मिळणार नसल्याने हया शुल्काचा कोणत्याही प्रकारे अन्य ठिकाणी वापर करता येणार नाही. )**

१५.**किरकोळ शुल्क:-** महाविद्यालयातील दुरध्वनी देयक, वीज देयक, पाणी व अन्य कर, छपाई, स्टेशनरी विद्यापीठीय कामासाठी करावा लागणारा प्रवास खर्च व भत्ता इ. खर्च भागावा म्हणून किरकोर शुल्क नव्याने आकारण्यात येत आहे. या खर्चासाठी महाविद्यालया प्रशासनाला मोठया प्रमाणात खर्च करावे लागतात त्यात माफक हातभार म्हणून हे शुल्क आकारण्यात येत आहे.

१६.**अश्वमेघ शुल्क:-** आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळण्यासाठी हे शुल्क मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या आदेशान्वये व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ निर्देश क्र.१/२००६ अन्वये प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु.२०/- एवढे शुल्क आकारले जाते. व या शुल्काचा खालीलप्रमाणे विनियोग करावा असे उपरोक्त पत्रात नमूद केले आहे.

Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE



CamScanner

१. रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे अश्वमेध स्पर्धा आयोजक विद्यापीठाकडे पाठवावेत

२. रु.२/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे आंतरविद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धा (इंद्रधनुष्य) आयोजक विद्यापीठाकडे पाठवावेत.

३. रु.६/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे महाविद्यालयाकडे ठेवावेत यातील किमान रु.३/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे क्रीडा विभागाच्या Infrastructure विकासाठी दरवर्षी वापरावेत व उर्वरीत रु.३/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे महाविद्यालयीन सांस्कृतिक उपक्रम, HIV awareness विषयी कार्यक्रम व क्रीडास्पर्धांसाठी दरवर्षी वापरावेत.

४. रु.८/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे विद्यापीठाला पाठवावेत. त्यातून विद्यापीठाला रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे सांस्कृतिक व क्रीडाउपक्रमासाठी व Sport infrastructure development साठी खर्च करावा व उर्वरीत रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे स्वतंत्र निधीत वर्ग करुन सल्लागार मंडळाने नियोजन केलेल्या उपक्रमांसाठी दरवर्षी खर्च करावा.

**एकुण अश्वमेध फी रु.२०/- पैकी रु.६ महाविद्यालयाकडे ठेवावेत व रु.१४/- विद्यापीठाकडे पाठवावेत.**

**उपरोक्त प्रमाणे सुधारीत करण्यात आलेल्या शुल्काची आकारणी शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून करण्यात येवून ज्या बाबीसाठी शुल्क घेण्यात आलेले आहे त्याचा विनियोग त्या कारणासाठी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होईल, या दृष्टीने प्रयत्न करावा. वेळोवेळी एल.आय.सी. समितीने मागणी केल्यास शुल्कासंबधीचे सर्व दस्तऐवज दाखवावे व विद्यापीठास सहकार्य करावे. सदर परिपत्रकाचा आशय संबधीतांच्या नजरेस आणून देवून त्या प्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती,**

(डॉ.मु.य.बरीदे)
कुलसचिव

**शैक्षणिक सुविध कक्ष/अभ्यासमंडळे/प्रवेश विभाग,**
**जा.क्र.उमवि/२१/शुल्क/१५८/२००८**
**दिनांकः-११/०४/२००८**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादरः-**

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यलांये
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा.विभाग प्रमुख, प्रशासकिय विभाग,उमवि,जळगाव

**E:\२००७\shulka२००८.doc**
*Hp//११३/PramodChavan*

Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE



CamScanner

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव

# परिपत्रक क्र. १४३/२००३

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परिपत्रक क्र. १२६/२००३ जा.क्र.:- उमवि/१२/इ.शुल्क/१५४२/२००३ दि.५/६/२००३ अन्वये विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे इतर शुल्क कळविण्यात आले होते. विविध विद्यार्थी संघटनांच्या शुल्क कमी करण्याच्या मागणीचा विचार करून मा. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या दि.३ जुलै,२००३ रोजी झालेल्या सभेत ठराव क्र.ए१६/२००३ नुसार शुल्क रचनेत सुधारणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून खालील प्रमाणे सुधारित शुल्क आकारण्यात यावे.

विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात आलेल्या शुल्काच्या वापरा संबधीच्या सुचना पूर्वीच्या परिपत्रक क्र.१२६/२००३ अन्यवे कळविल्या प्रमाणेच राहतील याची नोंद घ्यावी.

**OTHER FEES FOR NON-PROFESSIONAL AND PROFESSIONAL COURSES**

| Sr no | Head of fees | Non-Professional Revised | | Professional Revised | |
|---|---|---|---|---|---|
| | | U.G. | P.G. | U.G. | P.G. |
| 1 | Gymkhana fee | 90 | 90 | 140 | 140 |
| 2 | Student Welfare fee | 25 | 30 | 40 | 50 |
| 3 | Library fee | 100 | 200 | 100 | 200 |
| 4 | Computerisation fee | 20 | 20 | 20 | 20 |
| 5 | Student Aid fee | 30 | 50 | 50 | 75 |
| 6 | Admission fee | 25 | 25 | 50 | 75 |
| 7 | Medical fee | 11 | 11 | 11 | 11 |
| 8 | Magazine fee | 30 | 30 | 30 | 30 |
| 9 | Development fee | 50 | 60 | 60 | 75 |
| 10 | Laboratory fee [only for Science] | 400 | 800 | | |
| 11 | Registration fee | | 50 | 75 | 75 |
| 12 | Ashwamedh fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | Student Emergency fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 14 | Pro-rata fee | 01 | 01 | 01 | 01 |
| 15 | Student Group Insurance | 02 | 02 | 02 | 02 |
| 16 | Gathering fee | 40 | 40 | 60 | 60 |
| | TOTAL | 844 | 1429 | 659 | 834 |

*इतर अभ्यासक्रमासाठी प्रयोग शाळा शुल्क स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

NMU-

**DEPOSITS:**

| | U.G. | P.G. |
|---|---|---|
| 1. Library | 100 | 150 |
| 2.Laboratory | 150 | 250 |

वरील तक्त्यात नमुदकेलेल्या शुल्कामधील खालील नमुद केलेल्या तक्त्यात महाविद्यालयाने ठेवावयाची रक्कम व विद्यापीठास पाठवावयाची रक्कम याचा तपशिल दिलेला असून त्या तपशिलाप्रमाणे प्रती विद्यार्थी विद्यापीठाचा हिस्सा महाविद्यालयांनी प्रती वर्षी ३१ ऑक्टोबर पर्यंत विद्यापीठास पाठवावयाचा आहे.

| sr. no. | Head of fees | Non-Professional | | | | Professional | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Colleges | | University | | Colleges | | University | |
| | | U.G | P.G | U.G | P.G | U.G. | P.G | U.G | P.G |
| 1 | Gymkhana fee | 70 | 70 | 20 | 20 | 105 | 105 | 35 | 35 |
| 2 | Student Welfare fee | 20 | 20 | 5 | 10 | 30 | 40 | 10 | 20 |
| 3 | Computerisation fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 4 | Student Aid fee | 25 | 40 | 5 | 10 | 40 | 60 | 10 | 15 |
| 5 | Development fee | 40 | 45 | 10 | 15 | 45 | 55 | 15 | 20 |
| 6 | Ashwamedh fee | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 7 | Student Emergency fee | - | - | 10 | 10 | - | - | 10 | 10 |
| 8 | Medical fee | 6 | 6 | 5 | 5 | 6 | 6 | 5 | 5 |
| 9 | Pro-rata | - | - | 1 | 1 | - | - | 1 | 1 |
| | TOTAL | 176 | 196 | 71 | 86 | 241 | 281 | 101 | 121 |

आपणास विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे सुधारित करण्यात आलेल्या इतर शुल्काची आकारणी शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून करण्यात यावे. सदर परिपत्रकाचा आशय संबंधीतांच्या नजरेस आणून देवून त्या प्रमाणे कार्यवाही करावी,ही विनंती.

जा.क्र.:-उमवि/१२/इ.शुल्क/११०१/२००३
दि. ०४/०७/२००३

कुलसचिव

प्रत माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव रवाना:-

१) मा.प्राचार्य ,सर्व संलग्नीत महाविद्यालये,
२) मा.संचालक,सर्व मान्यताप्राप्त संस्था
३) मा.वित्त व लेखाधिकारी,उमवि,जळगाव
४) मा.परिक्षा नियंत्रक,उमवि,जळगाव
५) मा.उपकुलसचिव/सहा.कुलसचिव,परीक्षा, प्रशासन, संलग्नता,वित्त,उमवि,जळगाव
६) मा.पध्दती विश्लेषक,उमवि,जळगाव
७) मा.जनसंपर्क अधिकारी उमवि,जळगाव
८) मा.कायदा अधिकारी,उमवि,जळगाव
९) मा.कुलगुरु यांचे कार्यालय,उमवि,जळगाव
१०)मा.कुलसचिव यांचे कार्यालय,उमवि,जळगाव

DHULE

C:\My Documents\feeprai2.doc
Pramod Chavan/7/4/03

CamScanner

Nmu-2

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## परिपत्रक क्र.१२६/२००३

विद्यापीठाने परिपत्रक क्र. ७८/९४ दि. २५.५.१९९४ अन्वये विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे इतर शुल्क निर्धारीत केले होते. त्यानंतर आता पर्यंत इतर शुल्क मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही. दरम्यान कागदाच्या वाढत्या किंमती, छपाईचा खर्च व इतर बाबींमध्ये झालेली वाढ विचारत घेता इतर शुल्काचा फेरविचार करणे क्रमप्राप्त झाले होते. याचा विचार करुन विद्यापीठ अधिकार मंडळाने इतर शुल्क सुधारीत करण्यासाठी समितीचे गठण केले होते. जागतिकीकरणामुळे निर्माण होणारी प्रचंड स्पर्धा, बेरोजगारीचा प्रश्न, नोकऱ्यांमधील कपात याचा विचार करता विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने महाविद्यालये अधिक सक्षम, सुदृढ, बहुआयामी होणे गरजेचे आहे. त्याकरीता काळानुरुप विविध सर्वांगिण विकासाचे कार्यक्रम, खेळ, प्रयोगशिलता यात वाढ होणे गरजेचे आहे. त्यामुळे महाविद्यालयांना नुवीन आर्थिक स्त्रोत शोधून विद्यार्थ्यांच्या विकासाचे उपक्रम राबविता येणे शक्य आहे. या आर्थिक स्त्रोतां पैकी एक प्रमुख म्हणजे शुल्क वाढ. आपल्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संपुर्ण भाग हा ग्रामीण, आदिवासी, शेतकरी व शेतमजूरवर्गाचा आहे. या वर्गाचा विचार करुन प्रत्येकाला परवडेल असे इतर शुल्क ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क ज्या कारणासाठी घेण्यात येते त्याच कारणासाठी ते खर्च व्हावयास हवे आहे. जेणे करुन त्याचा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उपयोग होईल यासाठी संबंधीत महाविद्यालयांनी कटाक्षाने या बाबीवर नियंत्रण ठेवावे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मा.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालील प्रमाणे इतर शुल्क सुधारित केले असून सदर सुधारीत शुल्क शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून अंमलात येईल.

**OTHER FEES FOR NON-PROFESSIONAL AND PROFESSIONAL COURSES**

| Sr no | Head of fees | Non-ProfessionalRevised | | ProfessionalRevised | |
|---|---|---|---|---|---|
| | | U.G. | P.G. | U.G. | P.G. |
| 1 | Gymkhana fee | 100 | 100 | 150 | 150 |
| 2 | Student Welfare fee | 30 | 40 | 50 | 60 |
| 3 | Library fee | 100 | 200 | 100 | 200 |
| 4 | Computerisation fee | 30 | 30 | 50 | 75 |
| 5 | Student Aid fee | 30 | 50 | 50 | 75 |
| 6 | Admission fee | 25 | 25 | 50 | 75 |
| 7 | Medical fee | 11 | 11 | 11 | 11 |
| 8 | Tutorial fee | 40 | 40 | - | - |
| 9 | Magazine fee | 35 | 35 | 35 | 35 |
| 10 | Development fee | 50 | 60 | 60 | 75 |
| 11 | *Laboratory fee(only for Science) | 500 | 1000 | | |
| 12 | Registration fee | 50 | 50 | 75 | 75 |
| 13 | Ashwamedh fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 14 | Student Emergency fee | 10 | 10 | 10 | 10 |
| 15 | Pro-rata fee | 01 | 01 | 01 | 01 |
| 16 | Student Group Insurance | 02 | 02 | 02 | 02 |
| 17 | Gathering fee | 50 | 50 | 75 | 75 |
| | TOTAL | 1074 | 1714 | 729 | 929 |

* इतर अभ्यासक्रमासाठी प्रयोगशाळा शुल्क स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

CS CamScanner

**DEPOSITS :**

| | | U.G. | P.G. |
|---|---|---|---|
| 1. | Library | 100 | 150 |
| 2. | Laboratory | 150 | 250 |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या शुल्कामधील खालील नमुद केलेल्या तक्त्यात महाविद्यालयाने ठेवावयाची रक्कम व विद्यापीठास पाठवावयाची रक्कम याचा तपशिल दिलेला असून त्या तपशिला प्रमाणे प्रती विद्यार्थी विद्यापीठाचा हिस्सा महाविद्यालयांनी प्रती वर्षी ३१ ऑक्टोबर पर्यंत विद्यापीठास पाठवावयाचा आहे.

| Sr. no. | Head of fees | Non-Professional | | | | Professional | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Colleges | | University | | Colleges | | University | |
| | | U.G. | P.G. | U.G. | P.G. | U.G. | P.G. | U.G. | P.G. |
| 1 | Gymkhana fee | 75 | 75 | 25 | 25 | 110 | 110 | 40 | 40 |
| 2 | Student Welfare fee | 20 | 25 | 10 | 15 | 30 | 35 | 20 | 25 |
| 3 | Computerisation fee | 20 | 20 | 10 | 10 | 30 | 50 | 20 | 25 |
| 4 | Student Aid fee | 25 | 40 | 5 | 10 | 40 | 60 | 10 | 15 |
| 5 | Development fee | 40 | 45 | 10 | 15 | 45 | 55 | 15 | 20 |
| 6 | Ashwamedh fee | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 7 | Student Emergency fee | - | - | 10 | 10 | - | - | 10 | 10 |
| 8 | Medical fee | 6 | 6 | 5 | 5 | 6 | 6 | 5 | 5 |
| 9 | Pro-rata | - | - | 1 | 1 | - | - | 1 | 1 |
| | TOTAL | 191 | 216 | 81 | 96 | 266 | 321 | 126 | 146 |

शुल्काचा विनियोग करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्धारित केल्या असून त्यांची अंमलबजावणी काटेकोर पणे करावी.

**१. जिमखाना शुल्कः-**

महाविद्यालयात क्रीडा संचालक किंवा क्रीडा विभाग प्रमुख असणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयांने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी झाले पाहिजे. जर महाविद्यालय त्या शैक्षणिक वर्षात स्पर्धेत सहभागी झाले नाही तर विद्यार्थ्यांना शुल्क परत करावे लागेल. प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा साहित्य, खरेदी करण्यासाठी तसेच खेळासाठी मैदान तयार करण्यासाठी हे शुल्क घेतले जावे. हे शुल्क जिमखाना विभागासाठीच खर्च करावे.

**२. विद्यार्थी कल्याण निधीः-**

हा निधी विद्यार्थ्यांसाठी उपयोगी असणाऱ्या उपक्रमांवर खर्च व्हायला हवा. विद्यार्थी सहाय्यता निधी योजना राबविण्यासाठीही या निधीचा उपयोग करावा.

**३. ग्रंथालयः-**

महाविद्यालयात ग्रंथालय व ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. नियमित वृत्तपत्रे, नियतकालीके, महाविद्यालयात असली पाहिजेत. ग्रंथालयात दरवर्षी नविन पुस्तकांची खरेदी तसेच नियतकालीकांची खरेदी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध झाली पाहिजेत. हे शुल्क ग्रंथालयासाठीच वापरले गेले पाहिजे.

४. संगणक शुल्क:-

महाविद्यालयाचे कामकाज गतीमान होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संगणक प्रयोगशाळा अद्ययावत होण्यासाठी ही शुल्क वाढ आहे. संगणक खरेदी व संगणकाची देखभाल यासाठी हा खर्च करावा.

५. विद्यार्थी सहायता निधी:-

गरीब विद्यार्थ्यांना सहाय्यता, विद्यार्थ्यांना वैद्यकिय उपचारांसाठी मदत तसेच पुस्तक व शैक्षणिक साहित्यासाठी मदत इ. उपक्रमांसाठी हे शुल्क घ्यावे व त्यासाठीच वापरावे.

६. वैद्यकीय शुल्क:-

विद्यार्थ्यांची मेडीकल चेकअप होणे गरजेचे आहे. त्यासंबंधीचा अहवाल तयार केला पाहिजे.

७. ट्युटोरीयल शुल्क:-

ज्या विद्याशाखेअंतर्गत ट्युटोरीयल्स किंवा टेस्ट होतात त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे सरासरी किती खर्च, होतो हे विचारात घ्यायला हवे. वर्षातुन किमान चार अंतर्गत परिक्षा होणे आवश्यक आहे, असे वाटते.

८. नियतकालिक शुल्क:-

नियतकालिक शुल्क जर घेतले जात असेल तर नियतकालीक छापणे व विद्यार्थ्यांना देणे बंधनकारक राहील. नियतकालिक काढले तर विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याला चांगली संधी उपलब्ध होते. त्यामुळे ३ भाषांत अंक काढावा. अंक रंगीत व किमान १२५ पानी असावा, असा अंक काढल्यास तो या शुल्कात बसू शकतो. दरवर्षी निघणारा अंक स्थानिक चौकशी समितीच्या सभासदांना देणे व विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. जर अंक काढला नाही तर विद्यार्थ्यांना शुल्क परत करणे बंधनकारक राहील.

९. विकास निधी:-

विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था, क्लासरूमध्ये फॅन, लाईट व विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता गृहांची सुविधा इ. साठी हा निधी वापरण्यात यावा.

१०. प्रयोगशाळा शुल्क:-

सुसज्ज अशी प्रयोगशाळा असावी. प्रयोगशाळेत सर्व प्रकारचे साहित्य व रसायने उपलब्ध असावेत. त्यासाठीच हा निधी खर्च करावा.

११. नोंदणी शुल्क:-

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून नोंदणी शुल्क म्हणून जमा होणाऱ्या शुल्काचा विनियोग हा महाविद्यालयाने आपला प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी करावा.

१२. प्लेसमेंट शुल्क:-

प्लेसमेंट कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. त्यातुन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. त्यासाठी योजना तयार करुन प्रत्यक्ष उद्योगांशी संपर्क होणे आवश्यक आहे.

Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

CamScanner

1800
५
1300
500



३. विद्यार्थी उपक्रम शुल्क (गॅदरिंग शुल्क):-
गॅदरिंगचा रिपोर्ट तयार करून पाठवावा. जर गॅदरिंग झाली नाही तर शुल्क परत करावे.

शैक्षणिक आणि इतर शुल्क विद्यार्थ्यांस परत करण्याचे नियम -

) प्रवेश घेतल्या पासून सात दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनै जर प्रवेश रद्द केला तर प्रवेश शुल्क सोडून शैक्षणिक व इतर शुल्कामध्ये १० टक्के कपात करावी.

) प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांने जर प्रवेश रद्द केला तर प्रवेश शुल्क सोडून शैक्षणिक व इतर शुल्का मध्ये २५ टक्के कपात करावी.

) प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसानंतर विद्यार्थ्यांने जर प्रवेश रद्द केला तर कुठलेही शुल्क परत करु नये.

उपरोक्त प्रमाणे सुधारित करण्यात आलेल्या इतर शुल्काची आकारणी शैक्षणिक वर्ष २००३-२००४ सून करण्यात येवून ज्याबाबीसाठी शुल्क घेण्यात आलेले आहे त्याचा विनियोग त्याच कारणासाठी करणे प्रनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होईल, या दृष्टीने प्रयत्न करुन विद्यापीठास इकार्य करावे. सदर परिपत्रकाचा आशय संबंधीतांच्या नजरेस आणून देवून त्या प्रमाणे कार्यवाही करावी, ही नंती.

कुलसचिव

.क्र.:-उमवि/१२/इ.शुल्क/९५४२/२००३
५/६/२००३

माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना:-

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये,
२) मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३) मा. विभाग प्रमुख, प्रशासकीय विभाग, उमवि जळगाव

Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५ ००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-४२५ ००१


पत्र पेटी क्र. : ८०
तार : उत्तमविद्या
दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५८४२८ ते २९
फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३
: ०२५७-२२५८४०६

Post Box No : 80
Telegraphic Address : UTTAMVIDYA
Telephone No : 0257-2258428 to 29
Fax No : 0257-2258403
: 0257-2258406
E-mail : registrar@nmu.ac.in


### परिपत्रक क्रमांक:१२४/२००८

विद्यापीठाने परिपत्रक क्र.१२६/२००३ व १४३/२००३ अन्वये विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे इतर शुल्क निर्धारीत केले होते. त्यानंतर आता पर्यंत इतर शुल्कांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही. Non-Salary Grant शासनाकडून सद्यस्थितीत मिळत नसल्यामुळे महाविद्यालयांचा दैनंदिन खर्च भागविणे जिकरीचे होऊन बसले आहे. वाढत्या महागाई मुळे स्वाभाविकपणे कागदाच्या किंमती, छपाई खर्च व परीक्षांसाठी करावा लागणारा प्रवास खर्च आणि इतर खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे.

उच्च शिक्षण क्षेत्राच्या जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर स्पर्धा वाढली आहे. आपल्या देशात जगाच्या तुलनेने सर्वाधिक युवक वर्ग आहे व हा सर्व युवक वर्ग उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक आहे. या युवाशक्तीला स्पर्धेच्या युगात योग्य शिक्षणाची संधी मिळाली तर जागतिक पातळीवर नावलौकीक प्राप्त करु शकतील, असे सर्वात मोठे व उपयुक्त मानवसंसाधन ठरेल. याच युवाशक्तीच्या आधारे राष्ट्र जागतिक महासत्ता बनु पाहत आहे. यासाठी आपल्याकडील महाविद्यालये शैक्षणिक दृष्ट्या प्रगल्भ, अधिक सक्षम व बहुआयामी होणे गरजेचे आहे. काळानुरुप शिक्षण अभ्यासक्रम, कार्यक्रम, खेळ, विविध उपक्रम यात वाढ करावी लागेल. महाविद्यालयाने स्वाभाविकपणे स्पर्धेला सामोरे जायचे असेल तर infrastructure मध्ये बदल करावा लागेल. Internet साठी लागणारे सर्व साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावयाचे असेल तर महाविद्यालयांची आर्थिक स्थिती चांगली झाली पाहिजे. यासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान अत्यल्प असल्याने या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांची आर्थिक स्थिती सुदृढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी शुल्क वाढ करणे अपरिहार्य आहे. परंतु आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील बहुतांशी विद्यार्थी हा शेतकरी, कष्टकरी, मध्यम उत्पन्न गटातील व वनवासी क्षेत्रातील आहे. त्याला परवडेल एवढे शुल्क ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क ज्या कारणासाठी घेण्यात येते त्याच कारणासाठी ते खर्च व्हावयास हवे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मा.अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालील प्रमाणे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांचे शुल्क सुधारीत केले असून सदर सुधारीत शुल्क शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून अंमलात येईल.

To,


DHULE

(तक्ता क्र.१)

**अव्यावसायिक व व्यवसायिक अभ्यासक्रमाकरीताचे इतर शुल्क**

| Sr. No. | Fee | शुल्क | Non-Professional Revised | | | Professional Revised | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | U.G. | P.G. Arts/ Commerce | P.G. Science | U.G. | P.G. |
| 1 | Admission Fee | प्रवेश शुल्क | 25 | 25 | 25 | 50 | 75 |
| 2 | Registration Fee | नोंदणी शुल्क | - | 75 | 75 | 75 | 75 |
| 3 | Library Fee | ग्रंथालय शुल्क | 125 | 250 | 300 | 200 | 400 |
| 4 | Medical Fee* | वैधकिय शुल्क* | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 5 | Gymkhana Fee | जिमखाना शुल्क | 100 | 100 | 100 | 200 | 200 |
| 6 | Tutorial & Internal Exam. Fee | अंतर्गत परिक्षा शुल्क | 60 | 60 | 100 | 100 | 100 |
| 7 | Disaster Management Fee | आपत्कालीन व्यवस्थापण शुल्क | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 8 | Magazine Fee | वार्षिक नियतकालीक शुल्क | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 9 | Laboratory Fee (Science**) | प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान**) | 600 | - | - | - | - |
| 10 | College Development Fund | महाविद्यालय विकास निधी | 75 | 90 | 90 | 90 | 100 |
| 11 | Student Activities Fee | विद्यार्थी उपक्रम शुल्क | 40 | 50 | 50 | 60 | 75 |
| 12 | Poor student Aid Fund | गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी | 40 | 60 | 100 | 75 | 100 |
| 13 | Library Deposit | ग्रंथालय अनामत | 100 | 150 | 150 | - | - |
| 14 | Laboratory Deposit | प्रयोगशाळा अनामत | 150 | 250 | 250 | - | - |
| 15 | Ashwemedh Fee | अश्वमेध शुल्क | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 16 | Computerization Fee | संगणकीकरण शुल्क | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 17 | Student Group Insurance | विद्यार्थी समुह विमा | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 18 | MKCL Fee*** | एम.के.सि.एल. शुल्क *** | 50 | - | - | - | - |
| 19 | Gathering Fee | स्नेहसंमेलन शुल्क | 40 | 40 | 40 | 60 | 60 |
| 20 | Identity Card | ओळखपत्र शुल्क | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 21 | Alumni Association Fee**** | माजी विद्यार्थी संघ शुल्क**** | 25 | 25 | 25 | 25 | 50 |
| 22 | Personality Development & Career Guidance Fee | व्यक्तीमत्व विकास व व्यवसाय रोजगार मार्गदर्शन शुल्क | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 23 | Miscellaneous Fee | किरकोळ शुल्क | 100 | 150 | 150 | - | - |
| | | एकुण | 1685 | 1480 | 1610 | 1090 | 1390 |

* वैधकिय शुल्क फक्त प्रथम वर्ष नविन प्रयेशाकरिता व वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी राहील.

** अव्यावसायीक अभ्यासक्रमांतर्गत पदवीस्तरावरील द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रयोगशाळा शुल्क अनुक्रमे रुपये ७००/- व रुपये ८००/- असे राहील. पदव्युत्तर विज्ञान व व्यावसायीक अभ्यासक्रमांची प्रयोगशाळा व शिक्षण शुल्क करीता स्वतंत्र तक्ता जोडला आहे.

*** शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये फक्त पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्षाकरिता व नंतर क्रमाक्रमाने द्वितीय/तृतीय वर्षासाठी.

**** अव्यावसायीक अभ्याक्रमांर्गत केवळ पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या अंतीम वर्षाकरिता कला शाखेतील मानसशास्त्र व भुगोल विषयांसाठी प्रयोगशाळा शुल्क रु.१५०/- राहील.

**** व्यावसायीक अभ्याक्रमांतगत केवळ पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या अंतीम वर्षाकरिता.

टिप:- माहितीपत्रकासाठी रु.३०/- पेक्षा जास्त आकरणी करु नये.

* [illegible handwritten note] — भुगोल विषयासाठी — २५०/- प्रयोगशाळा शुल्क

DHULE ... Sabha's Arts, Com. & Sci. College

CamScanner

## महाविद्यालयाने ठेवावयाची रक्कम व विद्यापीठास पाठविण्याची रक्कम

| | Fee | | Non-Professional Revised | | | | | | BBM & MBM Professional Revised | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | U.G. | | | P.G. | | | U.G. | | | P.G. | | |
| | | | Fee | College Share | University Share | Fee | College Share | University Share | Fee | College Share | University Share | Fee | College Share | University Share |
| 1 | Gymkhana Fee | | 100 | 79 | 21 | 100 | 79 | 21 | 200 | 159 | 41 | 200 | 159 | 41 |
| 2 | Student Activities Fee | | 40 | 30 | 10 | 50 | 35 | 15 | 60 | 40 | 20 | 75 | 50 | 25 |
| 3 | Computerization Fee | | 20 | 10 | 10 | 20 | 10 | 10 | 20 | 10 | 10 | 20 | 10 | 10 |
| 4 | Poor student Aid Fund | Arts/Com | 40 | 30 | 10 | 60 | 45 | 15 | 75 | 60 | 15 | 100 | 80 | 20 |
| | | Science | | | | 100 | 75 | 25 | | | | | | |
| 5 | College Development Fund | | 75 | 60 | 15 | 90 | 90 | 20 | 90 | 70 | 20 | 100 | 75 | 25 |
| 6 | Ashamed Fee | | 20 | 6 | 14 | 20 | 70 | 14 | 20 | 6 | 14 | 20 | 6 | 14 |
| 7 | Medical | | 25 | 25 | 0 | 25 | 6 | 0 | 25 | 25 | 0 | 25 | 25 | 0 |
| | Student Group Insurance | | 5 | 0 | 5 | 5 | 25 | 5 | 5 | 0 | 5 | 5 | 0 | 5 |
| | Disaster Management Fee | | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 |
| | Total | | 335 | 240 | 95 | 480 | 435 | 135 | 505 | 370 | 135 | 555 | 405 | 150 |

(तक्ता क्र.२)

अ) विनाअनुदानित तत्वावरील पदव्युत्तर विज्ञान अभ्यासक्रमांकरिता तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या विविध शुल्कांव्यतिरिक्त अकारावयाचे प्रयोगशाळा शुल्क व शिक्षण शुल्क

### विज्ञान विद्याशाखा

| Subject | Tuition Fee | Laboratory Fee |
|---|---|---|
| Computer | 12000 | 9000 |
| I.T. | 12000 | 9000 |
| Mathematics/Statistics | 7000 | - |
| Microbiology / Biochemistry/Biotechnology | 12000 | 9000 |
| Chemistry | 12000 | 5000 |
| Botany/Zoology/Physics/ Electronics/ Environmental Science | 12000 | 3000 |
| Geography | 5000 | 2000 |



Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

CamScanner

ब) विना अनुदानित तत्वावरील पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरीता तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या विविध शुल्कांव्यतिरिक्त आकारावयाचे शिक्षण शुल्क व प्रयोगशाळा शुल्क

| Subject | Tuition Fee | Laboratory Fee |
|---|---|---|
| M.A. (Lib.Sci.) | 9000 | 1000 |
| M.A. (M.C.J.) (Mass-Communication) | 6000 | 2000 |

(तक्ता क्र.३)

विना अनुदानित तत्वावरील कला/मानसनिती व वाणिज्य विद्याशाखेतील पदवीस्तरावरील (बी.ए./बी.कॉम) अभ्यासक्रम/विशिष्ट विषयांकरिता आकरावयाचे शुल्क

(अ) बी.ए./बी.कॉम. हा संपुर्ण अभ्यासक्रम विना अनुदान तत्वावर असल्यास आकारावयाचे शिक्षण शुल्क.

| (अ-१) पदवी अभ्यासक्रम | | | (अ-१) पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता(एम.ए./एम.कॉम.) | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Particulars | Tuition Fee | Particulars | Tuition Fee |
| 1 | FY | 2000 | भाग-१ (एम.ए./एम.कॉम.) | 5000 |
| 2 | SY | 2000 | भाग-२(एम.ए./एम.कॉम.) | 5000 |
| 3 | TY | 2000 | | |

(ब) पदवी अभ्यासक्रमांतर्गत (बी.ए./बी.कॉम.) एखादा विषय विना अनुदान तत्वावर असल्यास आकारावयाचे शिक्षण शुल्क

| (ब-१) अन्य अभ्यासक्रम | | | (ब-१) संगणक विषय | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Particulars | Tuition Fee | Particulars | Tuition Fee |
| 1 | FY | 500 | FY | 350 |
| 2 | SY | 500 | SY | 400 |
| 3 | TY | 500 | TY | 450 |

Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

वाणिज्य व व्यवस्थापण विद्याशाखेअंतर्गत विशेष पदवी अभ्यासक्रम विना अनुदान तत्वावर असल्यास आकारावयाचे शिक्षण शुल्क

| Sr. No. | Particulars | Tuition Fee | | |
|---|---|---|---|---|
| | | FY | SY | TY |
| 1 | B.B.A. | 6000 | 6000 | 6000 |
| 2 | B.B.M. (Old B.B.S.) | 6000 | 6000 | 6000 |
| 3 | B.B.M. (Old E-Commerce) | 7000 | 7000 | 7000 |

(तक्ता क्र.४)

विज्ञान विद्याशाखेतील विनाअनुदान तत्वावरील पदवीस्तरावरील (बी.एस्सी.) अभ्यासक्रमांकरिता/विशिष्ट विषयांकरिता आकारावयाचे शुल्क

) बी.एस्सी. हा संपुर्ण अभ्यासक्रम विना अनुदान तत्वावर असल्यास आकारावयाचे शिक्षण शुल्क

| Sr. No. | Particulars | Tuition Fee Rs. |
|---|---|---|
| 1 | FY | 2500 |
| 2 | SY | 2500 |
| 3 | TY | 2500 |

) पदवी अभ्यासक्रमांतर्गत बी.एस्सी. एखाद्या विशिष्ट विषयांकरिता प्रतीवर्षी आकारावयाचे शिक्षण शुल्क व प्रयोगशाळा शुल्क

| Subject | If such subject is on Grant basis | | If such subject is on Non-Grant basis | |
|---|---|---|---|---|
| | Tuition Fee | Laboratory Fee | Tuition Fee | Laboratory Fee |
| For Computer / I.T | | | | |
| FY | -- | 1500 | 1500 | 2500 |
| SY | -- | 2000 | 2500 | 3000 |
| TY | -- | 3000 | 4000 | 4000 |
| Microbiology/Biochemistry/Biotechnology | | | | |
| FY | -- | 1000 | 3000 | 4000 |
| SY | -- | 1200 | 4500 | 4500 |
| TY | -- | 1500 | 7000 | 5000 |



Vidya Warddhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

CamScanner

**शुल्काचा विनियोग करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निधारीत केल्या असून त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.**

१. **जिमखाना शुल्क:-** हे शुल्क केवळ जिमखान्यासाठी खर्च करावे. प्रत्येक महाविद्यालयाने किमान ५ (पाच) खेळ निश्चित करुन, या ५ (पाच) खेळांसाठी तरी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेणे अपेक्षीत आहे. प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी मोठ्या संख्येने मैदानावर सरावासाठी यावेत यासाठी विशेष प्रयत्न करावेत. प्रत्येक महाविद्यालयात आवश्यक तेवढे क्रीडा साहित्य, खेळासाठी मैदान असले पाहिजे अथवा सरावासाठी मैदान उपलब्ध करुन द्यावे. प्रत्येक महाविद्यालयाने क्रीडा संचालकांच्या सहकार्यासाठी जिमखाना समिती गठित करुन क्रीडासंचालकांच्या मदतीला अनुभवी प्राध्यापकांचा या समितीत समावेश करावा,या समितीने वर्षाच्या प्रारंभीच आराखडा तयार करावा. आपल्या महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातील गुणवत्ता विकसीत होण्याच्या दृष्टीने विशेष प्रशिक्षक (Coach) बोलावून खेळाडूंसाठी प्रशिक्षण कार्यक्रम ठरवावेत. प्रशिक्षकांकरिता क्रीडा मंडळोडून सहकार्य व मार्गदर्शन घ्यावे. **प्रो-रेटा शुल्क हे जिमखाना शुल्क मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.**

२. **विद्यार्थी उपक्रम शुल्क:-** विद्यार्थी कल्याण निधी या शुल्कास अधिक स्पष्टता यावी म्हणून विद्यार्थी उपक्रम शुल्क (Students Activities fee) असे या पुढे संबोधले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व कलागुणांना वाव मिळावा यासाठी राज्य पातळीवरील, विभाग पातळीवरील, शासकिय पातळीवरील विविध महाविद्यालयांनी व प्रथितयश संघटनांनी आयोजित केलेल्या वक्तृत्व, वादविवाद, लेखन, निबंध, नृत्य, गायन (सर्वप्रकार) चित्रकला, नाटय, एकांकिका, मुकअभिनय, काव्यलेखन व वाचन, भित्तीपत्रक इ. सारख्या अनेक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास उद्युक्त करावे. वरील व अन्य स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त संघ पाठवावेत. राज्य व केंद्र शासनाने विविध सांस्कृतिक कला महोत्सव, नाटय व एकांकिका स्पर्धा तसेच प्रतिभासंगम कार्यक्रमास विद्यार्थ्यांना पाठवावे.

३. **गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी:-** विद्यार्थी सहाय्यता निधी या शुल्काचे गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी (Poor Student Aid fee) असे नामकरण करण्यात आले आहे. आपआपल्या महाविद्यालयातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तके, शैक्षणिक साहित्य , वसतीगृह शुल्क, परीक्षा शुल्क, अन्य शुल्क, मेस, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी आर्थिक मदती करता या निधीचा वापर व्हावा. गरीब विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवुन मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीमार्फत अर्ज मंजूर करता येतील.

४. **वैद्यकिय फी:-** महाविद्यालयात प्रथम वर्गात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची योग्य पध्दतीने वैद्यकिय तपासणी व्हावी म्हणून या शैक्षणिक वर्षापासून वैद्यकिय शुल्क रु.२५ प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून घ्यावयाची आहे. वैद्याकिय तपासणी अर्ज विद्यापीठाकडून प्रत्येकी रुपये १/- या प्रमाणे उपलब्ध होईल. वैद्याकिय तपासणी व्यवस्थीत होईल याकडे मा.प्राचार्यांनी गांभीर्याने लक्ष घालावे. वैद्यकिय तपासणी अर्ज विद्यापीठाकडे न पाठवता महाविद्यालयात छाननी करावी. एखाद्या विद्यार्थ्यांस गंभीर आजार असल्यास पुढील उपचारासाठी योग्य पाठपुरावा करावा. दरवर्षी रक्तगट संचयीका या अर्जावरुन तयार करुन महाविद्यालयात ठेवावी. स्थानिक ठिकाणी गरजु रोग्यांसाठी या रक्तगट संचयिकेचा रक्तदानासाठी उपयोग करता येईल. वैद्यकिय तपासणीचा संक्षिप्त अवहाल मात्र दरवर्षी विद्यापीठाकडे पाठवावा. रक्तगट संचयकिची एक प्रत विद्यापीठ कार्यालयास व विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाकडे सादर करावी.

Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE KAPIA



CamScanner

५. **विद्यार्थी समुह विमा:-** विद्यापीठ क्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांचा विमा दरवर्षी काढला जातो. दुर्देवाने एखादा विद्यार्थ्याचे अपघाती निधन झाल्यास विमा कंपनीतर्फे रुपये १०,०००/- व म.कुलगुरु वैद्यकिय निधीतुन रुपये ५,०००/- असे एकूण रुपये१५,०००/-त्या विद्यार्थ्याच्या पालकास मिळतात. ही जबाबदारी रुपये ५०,०००/- पर्यंत वाढवावी व म.कुलगुरु वैद्यकिय निधीतुन रुपये ५,०००/- असे एकुण ५५,०००/- त्या दुर्देवी विद्यार्थ्याच्या पालकास मिळावेत असा विचार करुन विद्यार्थी सुरक्षा शुल्क रुपये ५/- घ्यावयाचे आहेत. अशा दुर्देवी विद्यार्थ्याला विमा सुरक्षा मिळणेसाठी योग्य त्या कागदपत्रसह मा.प्राचार्यांनी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावा.

६. **वार्षिक नियतकालीक शुल्क:-** वार्षिक नियतकालीक शुल्क विद्यार्थ्याच्या साहित्यीक व लेखन शैलीला संधी मिळावी, यातुन तो विकसीत व्हावा, यासाठी वार्षिक नियतकालीक हे एक उत्तम साधन आहे. याच विद्यार्थ्यांमधुन उद्याचे साहित्यीक निर्माण होणार आहेत. म्हणून प्रत्येक महाविद्यालयाने दरवर्षी नियमितपणे वार्षिक नियतकालीक प्रकाशीत करावे, किंबहुना वार्षिक नियतकालीक हे प्रत्येक महाविद्यालयाचा आरसा आहे या दृष्टीने मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये सर्वाधिक विद्यार्थ्यांच्या साहित्याचा समावेश असलेले व त्याच बरोबर महाविद्यालयाच्या वार्षिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व खेळाचे अहवाल, पारितोषक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे, विविध विभागांचे अहवाल इ.चाही सामावेश करुन आकर्षक असे वार्षिक नियतकालीक प्रकाशीत करावे. प्रकाशानंतर पाच अंक (५) विद्यापीठाच्या विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडे स्पर्धेसाठी व अवलोनार्थ पाठवावा.

७. **महाविद्यालया विकास निधी:-** महाविद्यालयात विद्यार्थीनी कक्ष, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रात्र अभ्यासीका, वर्गात पंखे, लाईट, बेंचेस व फर्निचर स्वच्छतरागृह, सायकलस्टॅंड इ. महाविद्यालय परिसर विकास विकासात्मक कामांसाठी हा निधी वापरावा.

८. **ग्रंथालय शुल्क:-** ग्रंथालयात सर्व विद्याशाखांचे क्रमिक व संदर्भ ग्रंथ पुरेशा संख्येत उपलब्ध असावेत. याच बरोबर ग्रंथालयात कथा, कांदबऱ्या, ऐतिहासिक, स्पर्धात्मक परीक्षेसाठी आवश्यक ती पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत. तसेच विविध प्रकारची नियतकालीके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके व मासिक ग्रंथालयात असावीत व ती सहजपणे विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावीत. ग्रंथालय हे सुसज्ज, प्रसन्न असावे. विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वाचनकक्ष असावे. स्पर्धा परिक्षा करीता स्वतंत्र वाचन कक्ष असावा.विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेवून रात्र अभ्यासिका सुरु करावी.

९. **प्रयोगशाळा शुल्क:-** प्रत्येक महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांसाठी सुसज्ज अशी प्रयोगशाळा असावी. प्रयोगशाळेत आवश्यक ते व त्या प्रमाणात साहित्य/रसायने उपलब्ध व्हावीत. विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर पडावी या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्याला प्रात्याक्षिकासाठी संधी मिळावी.

१०. **स्नेहसंमेलन शुल्क:-** विद्यार्थ्यांच्या कला गुंणाना वाव देणारा, परीक्षेच्या आधी विरंगुळा म्हणून आपण स्नेहसंमेलनाकडे पाहतो. विद्यार्थ्यांनी बसविलेल्या कार्यक्रमांवर स्नेहसंमेलनात भर असावा. मा.प्राचार्यांनी विद्यार्थी परिषद व प्राध्यापक वृंद यांच्याशी कौशल्याने संवाद साधुन स्नेहसंमेलनाचे आयोजन करावे. अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेणारे, अधिक विद्यार्थ्यांना संधी देणारे कार्यक्रम ठरवावेत, Commercial-Programmer व D.J.) सारखी महागडी वाद्यवृंद टाळावेत. (स्नेहसंमेलनाच्या उत्कृष्ट आयोजन व



Sabha's Arts, Com. & Sci. DHULE

यशस्वीतेसाठी प्राध्यापकवर्गाची सकारात्मक भुमिका अधिक महत्वाची आहे. मा.प्राचार्य, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यात योग्य तो समन्वय साधला गेल्यास Team-Spirit ने उत्कृष्ट स्नेहसंमेलन होवू शकते.

११. **अंतर्गत परीक्षा व टयुटोरियल शुल्क:-** प्रत्येक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने अंतर्गत परीक्षा व टयुटोरियल्स घणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मुल्यमापनासाठी याचा चांगला उपयोग होवू शकतो. आवश्यक त्या विद्याशाचो अंतर्गत प्रात्याक्षिक परीक्षेच्या खर्चासाठी या शुल्काचा वापर व्हावा. टयुटोरियल्स व अंतर्गत परीक्षा घेतल्यावर त्यांचे मुल्यमापन केले जावे, व विद्यार्थ्यांना चर्चेस बोलवावे.

१२. **व्यक्तीमत्व विकास व रोजगार मार्गदर्शन शुल्क:-** शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर अन्य उपक्रमांमधुनही विद्यार्थी घडत जातो. त्याच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने संवाद कोशल्य, मुलाखत तंत्र, मुलाखतीची पुर्व तयारी इ. विषयांवर विविध कार्यक्रमांचे नियमित आयोजन व्हावे व काही स्थानिक रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध होत असल्यास त्या दृष्टीने महाविद्यालयाने पाऊले उचलावित. इतर महाविद्यालयाशी किंवा विद्यापीठाशी संपर्क साधावा. रोजगारासंबधी मार्गदर्शन नियमितपणे केले जावे. रोजगारासंबधी नियतकालीके उपलब्ध करुन द्यावेत. मुलाखतींना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी तयार व्हावा यादृष्टीने मार्गदर्शन करावे.

१३. **माजी विद्यार्थी संघ शुल्क:-** हे शुल्क फक्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडूनच घ्यावे. दरवर्षी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा, अन्य कार्यक्रमांचे आयोजन केले जावे. माजी विद्यार्थ्यांचे व आपल्या महाविद्यालयाचे अतुट नाते निर्माण होण्याच्या दृष्टीने उपक्रमांची आखणी करावी, माजी विद्यार्थ्यांकडून मार्गदर्शन घ्यावे.

१४. **संगणकीकरण शुल्क:-** प्रवेशीत विद्यार्थ्यांची संपुर्ण अद्ययावत माहिती महाविद्यालयाकडे असावी, वेळोवेळी ही माहिती अद्ययावत करावी. यासाठी संगणक प्रणाली व अनुषंगीक सामुग्री खरेदी, देखभाल या करीता या शुल्काचा वापर करावा. ई-सुविधा च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या Infrastructure साठीही या शुल्काचा वापर करावा.(**माञ एम.के.सी.एल. शी झालेल्या करारानुसार एम.के.सी.एल. शुल्कामधुन विद्यापीठास व महाविद्यालयास काहीही शुल्क मिळणार नसल्याने हया शुल्काचा कोणत्याही प्रकारे अन्य ठिकाणी वापर करता येणार नाही.** )

१५. **किरकोळ शुल्क:-** महाविद्यालयातील दुरध्वनी देयक, वीज देयक, पाणी व अन्य कर, छपाई, स्टेशनरी विद्यापीठीय कामासाठी करावा लागणारा प्रवास खर्च व भत्ता इ. खर्च भागावा म्हणून किरकोर शुल्क नव्याने आकारण्यात येत आहे. या खर्चासाठी महाविद्यालया प्रशासनाला मोठया प्रमाणात खर्च करावे लागतात त्यात माफक हातभार म्हणून हे शुल्क आकारण्यात येत आहे.

१६. **अश्वमेघ शुल्क:-** आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळण्यासाठी हे शुल्क मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या आदेशान्वये व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ निर्देश क्र.१/२००६ अन्वये प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु.२०/- एवढे शुल्क आकारले जाते. व या शुल्काचा खालीलप्रमाणे विनियोग करावा असे उपरोक्त पत्रात नमूद केले आहे.

Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

१. रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे अश्वमेध स्पर्धा आयोजक विद्यापीठाकडे पाठवावेत
२. रु.२/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे आंतरविद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धा (इंद्रधनुष्य) आयोजक विद्यापीठाकडे पाठवावेत.
३. रु.६/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे महाविद्यालयाकडे ठेवावेत यातील किमान रु.३/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे क्रीडा विभागाच्या Infrastructure विकासाठी दरवर्षी वापरावेत व उर्वरीत रु.३/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे महाविद्यालयीन सांस्कृतिक उपक्रम, HIV awareness विषयी कार्यक्रम व क्रीडास्पर्धांसाठी दरवर्षी वापरावेत.
४. रु.८/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे विद्यापीठाला पाठवावेत. त्यातून विद्यापीठाला रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे सांस्कृतिक व क्रीडाउपक्रमासाठी व Sport infrastructure development साठी खर्च करावा व उर्वरीत रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यामागे स्वतंत्र निधीत वर्ग करुन सल्लागार मंडळाने नियोजन केलेल्या उपक्रमांसाठी दरवर्षी खर्च करावा.

**एकुण अश्वमेध फी रु.२०/- पैकी रु.६ महाविद्यालयाकडे ठेवावेत व रु.१४/- विद्यापीठाकडे पाठवावेत.**

**उपरोक्त प्रमाणे सुधारीत करण्यात आलेल्या शुल्काची आकारणी शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून करण्यात येवून ज्या बाबीसाठी शुल्क घेण्यात आलेले आहे त्याचा विनियोग त्या कारणासाठी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास साध्य होईल, या दृष्टीने प्रयत्न करावा. वेळोवेळी एल.आय.सी. समितीने मागणी केल्यास शुल्कासंबधीचे सर्व दस्तऐवज दाखवावे व विद्यापीठास सहकार्य करावे. सदर परिपत्रकाचा आशय संबधीतांच्या नजरेस आणून देवून त्या प्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती,**

(डॉ.मु.व.बरीदे)
कुलसचिव

**शैक्षणिक सुविध कक्ष/अभ्यासमंडळे/प्रवेश विभाग,**
**जा.क्र.उमवि/२१/शुल्क/१५८/२००८**
**दिनांक:-११ /०४/२००८**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर:-**
१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा.विभाग प्रमुख, प्रशासकिय विभाग,उमवि,जळगाव

E:\२००७\shulka२००८.doc
*Hp//११३/PramodChavan*



Vidya Wardhini Sabha's Arts, Com. & Sci. College DHULE

CamScanner